पोलिसांनी थांबविली रेल्वे : स्थानकावरून तातडीने नेले रुग्णालयात

# राजकोट एक्स्प्रेस थांबा नसूनही थांबली.. अन् अवघडलेल्या तिनं कन्येला दिला जन्म

न्यूज अपडेट्स

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुर्डूवाडी/सोलापूर** : वार मंगळवार... दिनांक २७ डिसेंबर २०२२... वेळ रात्रीचे साडेआठ वाजलेले...अचानक लोहमार्ग पोलिसांना फोन आला... प्रसूतीग्रस्त महिलेला त्रास होत असल्याची माहिती कळाली... पोलिसांनी प्रसंगावधान दाखवित थांबा नसलेली राजकोट एक्स्प्रेस कुर्डूवाडी स्थानकावर थांबविली...त्या महिलेला सुखरूपपणे डब्यातून उतरविले अन् वेळेत रुग्णालयात पोहोचविले त्यानंतर तिने एका गोंडस मुलीला जन्म दिला अन् कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांच्या माणुसकीच्या दर्शनाने सर्वच भारावले.

ही घटना आहे कुर्डूवाडी रेल्वे स्थानकावरील. याबाबत सविस्तर वृत्त असे की, २७ डिसेंबर २०२२ रोजी रात्री ८४८ वाजता कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिस ठाण्यास माहिती मिळाली.. गाडी नंबर २२७०८ राजकोट एक्स्प्रेस कोच नंबर एस ५, सीट नंबर १० नंबरवरील महिला प्रवाशाला प्रसूती वेदना होत आहेत. याबाबतची माहिती मिळताच पोलिस हवालदार एम.टी.माने, हवालदार प्रकाश जिराळ व पोलिस नाईक विकास भोसले यांनी स्टेशनवर जाऊन गाडीला थांबा नसताना ती थांबविण्यास भाग पाडले.

तत्काळ त्या महिलेला गाडीतून खाली उतरवून ग्रामीण रुग्णालय, कुर्डूवाडी येथे दाखल केले. २७ डिसेंबर २०२२ रोजी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी त्या महिलेने गोंडस मुलीला जन्म दिला. ही उत्कृष्ट कामगिरी कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी अमोल गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार एम.टी.माने, पोलिस हवालदार प्रकाश जिराळ व पोलिस नाईक विकास भोसले यांनी पार पाडली.



कुर्डूवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलेल्या त्या महिलेसोबतच कुर्डूवाडी लोहमार्ग पोलिसांची टीम व नातेवाईक.

## हैद्राबादच्या महिलेची कुर्डूवाडीत प्रसूती...

रेल्वे प्रवासात असताना त्रास होत असल्याने मूळची हैद्राबाद येथील रहिवासी असलेली रंजनीदेवी महांतो ही महिला कुर्डूवाडी येथील ग्रामीण रुग्णालयात प्रसूत झाली. तिने गोंडस मुलीला जन्म दिला. तिच्यासोबत प्रवास करताना तिचे पती सुनीलकुमार महांतो हे उपस्थित होते. लोहमार्ग पोलिसांनी केलेल्या कामगिरीमुळे सर्वांनी लोहमार्ग पोलिसांचे अभिनंदन करून कौतुक केले.

## १५ मिनिटे गाडी थांबली

राजकोट एक्स्प्रेसला कुर्डूवाडी रेल्वे स्टेशनवर थांबा नाही. ती थेट सोलापूर रेल्वे स्थानकावरच थांबते,मात्र प्रसंगावधान राखत लोहमार्ग पोलिसांनी संबंधित रेल्वे यंत्रणेला कुर्डूवाडी रेल्वे स्थानकावर गाडी थांबविण्यास भाग पाडले. त्या महिलेच्या उपचारासाठी एक्स्प्रेस १५ मिनिटे स्थानकावरच थांबली होती. त्यानंतर ती पुन्हा धावत पुढे गेली.